03 JAN 2025
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

योग अभ्यासक्रमांचा असाही उपयोग : पाच वर्षांतील स्थिती

# विद्यापीठाच्या 'आजीवन'ने घडविले ३०० योगगुरू

गुड न्यूज

पोपट पवार
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोरोनानंतर व्यायामाबद्दल सध्या सगळेच जागरूक झाले असून योग करण्याकडे नागरिकांचा वाढता कल तयार झाला आहे; पण योग हा तसा अवघड व्यायाम प्रकार असल्याने योगाचे धडे देणारे अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाने मात्र ही कमतरता भरून काढली आहे. या विभागाच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या योगाच्या अभ्यासक्रमामुळे गेल्या पाच वर्षांत तब्बल ३०० योगशिक्षक तयार झाले आहेत. हे शिक्षक योग शिकू इच्छिणाऱ्यांना योगाचे धडे देत आहेत.



शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने योग अभ्यासक्रमाअंतर्गत योगाचे धडे दिले जातात.

> आताच्या धावपळीच्या जगात नागरिकांना ताणतणावांपासून दूर राहायचे असेल तर योगा करणे गरजेचे आहे. आरोग्यसंपन्न श्रीमंतीकडे जाण्यासाठी हे विद्यापीठातील योगा अभ्यासक्रम शिकणे महत्त्वाचे आहे.
> - डॉ. रामचंद्र पवार, संचालक, आजीवन अध्ययन-विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने योग सर्टिफिकेट, योग शिक्षक व एम.ए. योगशास्त्र हे अभ्यासक्रम शिकवले जातात. अगदी २४ वर्षांच्या तरुणांपासून ते ७५ वर्षांच्या ज्येष्ठांपर्यंत अनेकजण या अभ्यासक्रमाला प्रवेश घेत आहेत. यामध्ये योगशिक्षक हा एक वर्षाचा अभ्यासक्रम आहे. पाच वर्षांपासून हा अभ्यासक्रम सुरू झाला असून ३०० जणांनी योग शिक्षक अभ्यासक्रम यशस्विरीत्या पूर्ण केला आहे.

## योग प्रात्यक्षिकावर भर

आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या योग अभ्यासक्रमात प्रॅक्टिकलवर अधिक भर दिला आहे. राजारामपुरीत एका हॉलमध्ये सकाळच्या वेळी योगाचे वर्ग भरतात. येथील तीन शिक्षकांद्वारे मार्गदर्शन केले जाते.

## असा आहे अभ्यासक्रम

| अभ्यासक्रम | कालावधी |
|---|---|
| योग सर्टिफिकेट | ६ महिने |
| योग शिक्षक | ९ महिने |
| एम.ए. योगशास्त्र | दोन वर्षे |

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

03 JAN 2025 पुढारी

# आधुनिक जातव्यवस्थेला धक्के गरजेचे

## संपत देसाई ; वाचन संकल्प महाराष्ट्र अंतर्गत विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी भारतीय अस्पृश्यतेच्या प्रश्नांची सर्वप्रथम मांडणी केली. हा प्रश्न सोडविण्यासाठी हयातभर प्रयत्न केले. आधुनिक काळात उत्पन्नाची साधने व मार्ग जातिव्यवस्थेच्या उतरंडीनुसार ठरविले जातात. आधुनिक जातिव्यवस्थेला धक्के देण्याची गरज निर्माण झाली असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संपत देसाई यांनी केले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महर्षी वि. रा. शिंदे स्मृतिदिनानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संपत देसाई. सोबत डॉ. रणधीर शिंदे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. नंदकुमार मोरे. (छाया : नाज ट्रेनर)**

महाराष्ट्र शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'महर्षी शिंदे व महाराष्ट्रातील जातिनिर्मूलनाचे लढे' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.

देसाई म्हणाले, महर्षी शिंदे हे अस्पृश्यांच्या प्रश्नांवर अभ्यासपूर्ण मांडणी करणारे समाजसंशोधक होते. त्यांनी धार्मिक अंधश्रद्धांवर प्रहार करण्याचे काम केले. महर्षी शिंदे यांच्या चळवळीचा पायाविस्तार गेल्या शतकभरात झालेल्या सर्व चळवळींपर्यंत झाला. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांना देसाई यांच्या भाषणातून वाचनासाठी अनेक नवे संदर्भ मिळाले आहेत. हे सर्व संदर्भग्रंथ मिळवून त्यांचे वाचन करण्यास त्यांनी प्राधान्य द्यावे.

अध्यासन समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रभंजन माने यांनी आभार मानले. यावेळी बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. प्रल्हाद माने आदी उपस्थित होते.

0 3 JAN 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी शिंदेंनी अस्पृश्यतेची सैद्धांतिक मांडणी केली




कोल्हापूर : मार्गदर्शन करताना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संपत देसाई. सोबत डॉ. रणधीर शिंदे, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. विलास शिंदे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. नंदकुमार मोरे.

## ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संपत देसाई

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी भारतीय अस्पृश्यतेच्या प्रश्नाची सर्वप्रथम सैद्धांतिक मांडणी केली आणि हा प्रश्न सोडविण्यासाठी हयातभर प्रखर प्रयत्न केले, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संपत देसाई यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'महर्षी शिंदे आणि महाराष्ट्रातील जातिनिर्मूलनाचे लढे' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. राजर्षी शाहू सभागृहातील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

देसाई म्हणाले, महर्षी शिंदे हे अस्पृश्यांच्या प्रश्नांवर अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी करणारे समाजसंशोधक होते. या प्रश्नाच्या सोडवणुकीची निकड त्यांना भासत होती. त्यासाठी त्यांनी या समस्येच्या अनुषंगाने उपलब्ध माहितीचा मोठ्या प्रमाणावर अभ्यास व संशोधन करण्यावर भर दिला. देशविदेशांत उपलब्ध माहितीचे वाचन व संशोधन केले. स्पृश्यांच्या मनात अस्पृश्यांविषयी सहानुभूती आणि सहभाव निर्माण करण्याचा निर्धार करून ते कामाला लागले. त्यांच्या अथक प्रयत्नांतूनच हा मुद्दा राष्ट्रीय सभेच्या कार्यतालिकेवर आला आणि १९१७च्या कलकत्ता अधिवेशनात अस्पृश्यताविरोधी ठराव पारित करण्यात आला. महर्षी शिंदे यांनी धार्मिक अंधश्रद्धांवर प्रहार करण्याचेही काम केले. या आधुनिक जातिव्यवस्थेला धक्के देण्याची गरज आज निर्माण झाली. महर्षी शिंदे यांच्या चळवळीचा पायाविस्तार गेल्या शतकभरात झालेल्या या सर्व चळवळींपर्यंत झाला आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, संपत देसाई यांच्या जातिनिर्मूलन लढ्यांच्या व्यापक पट मांडणी कौशल्याचे कौतुक केले. विद्यापीठामध्ये अनेक अभ्यासक्रम सामाजिक कार्याशी संबंधित आहेत. विद्यार्थ्यांना देसाई यांच्या भाषणातून वाचनासाठी अनेक नवे संदर्भ मिळाले आहेत. हे सर्व संदर्भग्रंथ मिळवून त्यांचे वाचन करण्यास त्यांनी प्राधान्य द्यावे.

अध्यासन समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. डॉ. प्रभंजन माने यांनी आभार मानले. यावेळी डॉ. धनंजय सुतार, डॉ. प्रकाश पवार, डॉ. प्रल्हाद माने आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JAN 2025
सकाळ

# 'महर्षी शिंदेंकडून अस्पृश्यांच्या प्रश्नांवर अभ्यासपूर्ण मांडणी'



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे स्मृतिदिनानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना संपत देसाई.

कोल्हापूर, ता. २ : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अस्पृश्यांच्या प्रश्नांवर अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी करणारे समाजसंशोधक होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संपत देसाई यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'महर्षी शिंदे आणि महाराष्ट्रातील जाती निर्मूलनाचे लढे' या विषयावरील विशेष व्याख्यान ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी, तर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते. राजर्षी शाहू सभागृहात त्याचे आयोजन केले होते.

देसाई म्हणाले, 'महर्षी शिंदे यांनी भारतीय अस्पृश्यतेच्या प्रश्नाची सर्वप्रथम सैद्धांतिक मांडणी केली. हा प्रश्न सोडविण्यासाठी हयातभर प्रखर प्रयत्न केले. या प्रश्नाच्या सोडवणुकीची निकड त्यांना भासत होती. त्यासाठी त्यांनी या समस्येच्या अनुषंगाने उपलब्ध माहितीचा मोठ्या प्रमाणावर अभ्यास व संशोधन करण्यावर भर दिला. त्यांच्या अथक प्रयत्नांतूनच हा मुद्दा राष्ट्रीय सभेच्या कार्यतालिकेवर आला आणि १९१७ च्या कलकत्ता अधिवेशनात अस्पृश्यताविरोधी ठराव पारित करण्यात आला. महर्षी शिंदे यांनी धार्मिक अंधश्रद्धांवर प्रहार करण्याचेही काम केले.'

डॉ. शिर्के यांनी देसाई यांच्या जाती निर्मूलन लढ्याच्या व्यापक पट मांडणी कौशल्याचे कौतुक केले. बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार, राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. प्रल्हाद माने उपस्थित होते. अध्यासन समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रभंजन माने यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
03 JAN 2025 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी शिंदेंकडून अस्पृश्यतेची सैद्धांतिक मांडणी

## संपत देसाई : स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी भारतीय अस्पृश्यतेच्या प्रश्नाची सर्वप्रथम सैद्धांतिक मांडणी केली आणि हा प्रश्न सोडविण्यासाठी हयातभर प्रखर प्रयत्न केले, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संपत देसाई यांनी गुरुवारी केले. शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'महर्षी शिंदे आणि महाराष्ट्रातील जातिनिर्मूलनाचे लढे' या विषयावर विशेष व्याख्यानात ते बोलत



होते. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते. देसाई म्हणाले, महर्षी शिंदे हे अस्पृश्यांच्या प्रश्नांवर अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी करणारे समाजसंशोधक होते. या प्रश्नाच्या सोडवणुकीची निकड त्यांना भासत होती. त्यासाठी त्यांनी या समस्येच्या अनुषंगाने उपलब्ध माहितीचा मोठ्या प्रमाणावर अभ्यास व संशोधन करण्यावर भर दिला. खानेसुमारीचा अभ्यास व विश्लेषण केले. त्यातून भारतीय अस्पृश्यतेच्या प्रश्नाची साधार मांडणी ते करू शकले. त्यांच्या अथक प्रयत्नांतूनच हा मुद्दा राष्ट्रीय सभेच्या कार्यतालिकेवर आला आणि १९१७च्या कोलकाता अधिवेशनात अस्पृश्यताविरोधी ठराव मंजूर करण्यात आला.

आधुनिक काळातही उत्पन्नाची साधने आणि मार्ग जातिव्यवस्थेच्या उतरंडीनुसार ठरविले जातात. या आधुनिक जातिव्यवस्थेला धक्के देण्याची गरज आज निर्माण झाली असल्याचेही देसाई यांनी सांगितले. डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. डॉ. प्रभंजन माने यांनी आभार मानले. डॉ. धनंजय सुतार, डॉ. प्रकाश पवार, डॉ. प्रल्हाद माने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JAN 2025
लोकमत

# विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील हिंदी, इंग्रजी विभाग व अखिल भारतीय विकलांग चेतना परिषद (बिलासपूर) यांच्यावतीने दिव्यांग विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचा प्रारंभ आज, शुक्रवारी नीलांबरी सभागृहात होणार आहे. सकाळी अकरा वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन होईल. हैदराबाद येथील इंग्रजी व विदेशी भाषा विद्यापीठाचे डॉ. अमित कुमार, बिलासपूर येथील अ.भा. विकलांग चेतना परिषदेचे अध्यक्ष डॉ. अमित कुमार पाठक मार्गदर्शन करणार आहेत. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित असतील.

चर्चासत्रात देशभरातून ९० हून अधिक संशोधक, प्राध्यापक सहभागी होत असल्याची माहिती समन्वय डॉ. मनोहर वासवानी, हिंदी विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी आणि इंग्रजी विभागप्रमुख डॉ. प्रभंजन माने यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 JAN 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठात आज दिव्यांगविषयक चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील हिंदी, इंग्रजी विभाग व अखिल भारतीय विकलांग चेतना परिषद (बिलासपूर) यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचा प्रारंभ शुक्रवारी (दि. ३) नीलांबरी सभागृहात होत आहे. सकाळी ११ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन होईल. हैदराबाद येथील इंग्रजी व विदेशी भाषा विद्यापीठाचे डॉ. अमित कुमार, बिलासपूर येथील अखिल भारतीय विकलांग चेतना परिषदेचे अध्यक्ष डॉ. अमित कुमार पाठक मार्गदर्शन करणार आहेत. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल, अशी माहिती चर्चासत्राचे समन्वय डॉ. मनोहर वासवानी, हिंदी विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. प्रभंजन माने यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JAN 2025
तरुण भारत

# दिव्यांग विषयावर आज विद्यापीठात चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील हिंदी, इंग्रजी विभाग व अखिल भारतीय विकलांग चेतना परिषद (बिलासपुर) यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचा प्रारंभ आज (दि. ३) निलांबरी सभागृहात होणार आहे. सकाळी ११ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन होईल.

तसेच हैद्राबाद येथील इंग्रजी व विदेशी भाषा विद्यापीठाचे डॉ. अमित कुमार, बिलासपुर येथील अखिल भारतीय विकलांग चेतना परिषदेचे अध्यक्ष डॉ. अमित कुमार पाठक मार्गदर्शन करणार आहेत. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल. या चर्चासत्रात देशभरातून ९० हून अधिक संशोधक, प्राध्यापक सहभागी होत असल्याची माहिती चर्चासत्राचे समन्वय डॉ. मनोहर वासवानी, हिंदी विभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी व इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. प्रभंजन माने यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
0 3 JAN 2025 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात दीक्षांत समारंभाच्या कामाची लगबग

## १७ जानेवारीला होणार दीक्षांत समारंभ : समित्या नेमून कार्यक्रमाची तयारी जोरात

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षांत समारंभ शनिवार १७ जानेवारी रोजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊ सभागृहात होणार आहे. १६ जानेवारी रोजी दीक्षांत समारंभाचे औचित्य साधून ग्रंथप्रदर्शन व विक्री होणार आहे. दीक्षांत समारंभाच्या नियोजनासाठी विविध समित्या नेमल्या आहेत. या समित्यांना विविध प्रकारची कामे नेमून दिली आहेत. सध्या प्रमुख पाहुणे ठरवणे, पदवी प्रमाणपत्रांची छपाई यासह अन्य कामाची लगबग सुरू आहे. विद्यापीठातील समित्यांचे बैठका सत्र सुरू असून नियमानुसार काम करण्याच्या सूचना विद्यापीठ प्रशासनाने दिल्या आहेत.

दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुण्यांचे स्वागत, बैठक व्यवस्था, दीक्षांत पदवी, पदव्युत्तर प्रमाणपत्राचे वाटप, व्यासपीठावरील मान्यवरांचा ड्रेसकोड, यासह अन्य कामे नेमून दिली जातात. त्यासाठी समित्या तयार केल्या आहेत. दीक्षांत समारंभाचे थेट प्रक्षेपण होणार असल्यामुळे सर्वांनी जबाबदारीने काम करण्याच्या सूचना अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत. दीक्षांत समारंभाच्या कामासाठी ज्या कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे, त्या कर्मचाऱ्यांना इतर कामे देऊ नये, असे विभागप्रमुखांनी सांगण्यात आले आहे. या समारंभाच्या कामाला प्राधान्य देवून सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना परिपत्रकाद्वारे देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांना दीक्षांत समारंभाची माहिती व्हॉटसॲपव्दारे पहिल्यांदाच कळवली जाणार आहे. त्यामुळे त्यादृष्टीने परीक्षा विभागात काम सुरू आहे. पदवी प्रमाणपत्राची छपाई करण्याच्या पार्श्वभूमीवर लागणारी तयारी विद्यापीठातील प्रेसमध्ये सुरू आहे. जेणेकरून पदवी प्रमाणपत्राची बिनचूक छापाई व्हावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 JAN 2025
पुढारी



नेटबॉल स्पर्धेमध्ये उपविजेपद पटकावलेला कमला कॉलेजचा संघ.

# कमला कॉलेजचा नेटबॉल संघ उपविजेता

कोल्हापूर : आजरा महाविद्यालयांतर्गत शिवाजी विद्यापीठ येथे आंतरविभागीय नेटबॉल स्पर्धेमध्ये कमला कॉलेजचा संघ उपविजेता ठरला. या संघामध्ये सना मुल्ला, मानसी वासुदेव, सृष्टी देसाई, दिया माने, प्रज्वल चौगुले, स्नेहल बागणे, श्रुती कलकुटकी, सादिया शेख, दीक्षा कांबळे यांचा समावेश होता. ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राजक्त पाटील, प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर, शारीरिक शिक्षण संचालिक ज्योती लेंगरे, क्रीडाशिक्षक रघू पाटील, प्रशिक्षक पूजा ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JAN 2025
लोकमत

# नेटबॉल स्पर्धेत कमला कॉलेज उपविजेते

कोल्हापूर : आजरा महाविद्यालय, आजरा अंतर्गत शिवाजी विद्यापीठात झालेल्या आंतरविभागीय नेटबॉल स्पर्धेत कमला कॉलेजच्या संघाने उपविजेतेपद पटकाविले. संघात कर्णधार सना मुल्ला, मानसी वासुदेव, सृष्टी देसाई, दिया माने, प्रज्वल चौगुले, स्नेहल बागणे, श्रुती कलकुटकी, सादिया शेख, दीक्षा कांबळे यांचा समावेश होता. खेळाडूंना ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राजक्त पाटील, प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर, शारीरिक शिक्षण संचालिका ज्योती लेंगरे, क्रीडाशिक्षक रघू पाटील, प्रशिक्षक पूजा ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JAN 2025
लोकमत

# अनुष्का भोसले, धैर्यशील भोसले यांची निवड

कोल्हापूर : चेन्नई येथे होणाऱ्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात अनुष्का किरण भोसले आणि धैर्यशील किरण भोसले यांची निवड झाली. अनुष्का शिवाजी विद्यापीठाच्या एम.एस्सी. आणि धैर्यशील सिव्हिल इंजिनिअरिंग विभागात शिकत आहे. त्यांना प्रशिक्षक प्रभाकर डांगे, महेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. पी. डी. पाटील, प्रा. शरद नलवडे, प्रा. सुनील खराडे, प्रा. महेश पाटील यांचे प्रोत्साहन लाभले.